Vol 3 Issue 10 Nov 2013

ISSN No : 2230-7850

Monthly Multidisciplinary
Research Journal

# Indian Streams Research Journal

Executive Editor

Ashok Yakkaldevi

Editor-in-chief

H.N.Jagtap

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [ Malaysia ]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore University of Management Sciences [ PK ]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Indian Streams Research Journal
Volume-3, Issue-10, Nov-2013
ISSN 2230-7850
Available online at www.isrj.net

# शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत छात्रसेवाकाल पूर्ण करताना येणाऱ्या समस्यांचा अभ्यास

**विजय धामणे**
सहा. प्राध्यापक. टिळक शिक्षण महाविद्यालय, पुणे

***सारांश*** :व्यावसायिक प्रशिक्षणात प्रशिक्षणार्थींना कौशल्यांचे शिक्षण दिल्यानंतर त्यांना प्रत्यक्ष कामाचा अनुभव देण्यासाठी उमेदवारी काल असते. शिक्षक प्रशिक्षणात याला छात्रसेवाकाल म्हणतात. प्रस्तुत संशोधनात छात्रसेवाकाल या कार्यक्रमासंदर्भात छात्रअध्यापक, शिक्षक प्रशिक्षक व शाळेतील शिक्षक यांच्या समस्यांचा अभ्यास करण्यात आला आहे.

छात्रसेवाकाल या कार्यक्रमाच्या नियोजनात व अंमलबजावणीसंदर्भात छात्राध्यापक, शिक्षक प्रशिक्षक व शिक्षक यांना येणाऱ्या समस्यांचा शोध घेणे या प्रमुख उद्‌दिष्टांचा विचार प्रस्तुत संशोधनात केला आहे. पुणे शहरातील दहा शिक्षण महाविदयालये, त्यातील प्रत्येकी दोन शिक्षक प्रशिक्षक व दहा छात्रअध्यापकांची स्तरीय यादृच्छिक पध्दतीने निवड करण्यात आली होती. प्रस्तुत अभ्यासासाठी सर्वेक्षण पध्दतीचा वापर करून 100 छात्रअध्यापक, 20 शिक्षक प्रशिक्षक व 20 शिक्षकांकडून प्रश्नावलीव्दारे छात्रसेवाकाल कार्यक्रमाच्या समस्यांबाबत माहिती संकलित करण्यात आली. शेकडेवारी या संख्याशास्त्रीय तंत्राचा वापर करून निष्कर्ष काढण्यात आले. त्यातील प्रमुख निष्कर्ष म्हणजे छात्रसेवाकाल कार्यक्रमाचे नियोजन करताना वेळेची मर्यादा, मार्गदर्शनाची मर्यादा, तज्ज्ञतेचा अभाव, शिक्षकांची याबाबत नकारात्मक भावना, शालेय बेशिस्त इ.

***महत्वाचे शब्द*** : शिक्षक प्रशिक्षण, छात्रसेवाकाल.

***प्रस्तावना*** :

व्यावसायिक शिक्षणात प्रशिक्षणार्थींच्या कौशल्यावर लक्ष केंद्रीत करून ती कौशल्ये विकसनासाठी विविध माध्यमातून प्रयत्न करावे लागतात. जसे की डॉक्टर, वकील, इंजिनिअर इ. याप्रमाणे शिक्षकांकरिता लागणारी अध्यापनाची कौशल्ये विकसित करण्यासाठी शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये सुक्ष्म अध्यापन, सराव अध्यापन व छात्रसेवाकाल इ. चा समावेश केला आहे. प्रशिक्षणार्थींची कौशल्ये विकसनाची प्रक्रिया संपल्यानंतर या सर्व कौशल्यांचा वापर ज्या परिस्थितीत करावयाचा आहे, त्या परिस्थितीची संपूर्ण ओळख त्यांना व्हावी, तसेच शिक्षक प्रशिक्षणाची सर्व उद्दिष्टये साध्य व्हावीत या हेतूने छात्रसेवाकालाचा समावेश बी.एड्. पाठयक्रमात केला जातो.

स्वातंत्र्योत्तर काळात विविध शिक्षण आयोग स्थापन करण्यात आले. त्यापैकी शिक्षण प्रशिक्षणाबाबत कोठारी आयोगाने (1964–66) असे म्हटले आहे की, सर्वकश उमेव्दारीच्या कार्यक्रमामुळे विद्यार्थी शिक्षकांना शाळेचा सर्व कामकाजांचे निरीक्षण करण्याची संधी मिळू शकेल वर्गात व वर्गाबाहेर होणाऱ्या महत्वाच्या व्यवसायिक उपक्रमांत त्यांना सहभागी होता येईल. दर्जेदार शिक्षक जर निर्माण करायचा असेल तर त्याला फक्त वर्गात बसून तात्विक शिक्षण न देता प्रत्यक्ष तसा अनुभव देणे गरजेचे आहे. प्रशिक्षणार्थींना प्रत्यक्ष कामाचा अनुभव मिळावा हे छात्रसेवाकाळाचे उद्दिशट आहे. त्यासाठी त्याला प्रशिक्षण काळातच दर्जेदार अनुभव मिळायला हवे.

बी.एड्. अभ्यासक्रमाची उद्दिष्टे जर पाहिली तर ती पुढीलप्रमाणे दिसून येतात. भारतीय संविधानात नमूद केलेले मूल्य व गाभाघटक रूजविण्यासाठी क्षमता निर्माण करणे, सामाजिक बदल व आधुनिकीकरण यातील मध्यस्थ म्हणून भूमिका पार पाडणे, उत्कृष्ट शिक्षक बनण्यासाठी कार्यक्षमता व कौशल्य यांचा वापर करणे व यासारखी उद्दिष्टये साध्य करण्यासाठी छात्रसेवाकाळात त्यांना संधी मिळाली पाहिजे. मानसशास्त्रीय सिध्दांतानुसार व्यक्तीची सामाजिक आर्थिक, शैक्षणिक विकासासाठी आवश्यक अशी वृत्ती व कौशल्यांची जडण घडण करण्याचे आणि त्यांना आकार देण्याचे काम माध्यमिक शिक्षकांकडे आलेले आहे आणि त्यासाठी छात्रसेवाकाळात तेवढा दर्जेंदार अनुभव प्रशिक्षणार्थीना मिळणे गरजेचे आहे.

वरील सर्व गोष्टींचा विचार केला की, असे लक्षात येते की, शिक्षक प्रशिक्षण ही आजच्या काळात एक महत्वपूर्व बाब ठरू लागली आहे. छात्रसेवाकाळामध्ये विद्यार्थी शिक्षकांना प्रत्यक्ष कामकाजात सहभागी होण्याची संधी मिळते. भावी काळात शिक्षक म्हणून काम करण्याअगोदर अनुभवाने समृध्द करण्याचे काम छात्रसेवाकाळामुळे होउ शकते.

***1.1.छात्रसेवाकाल : अर्थ***

भावी अध्यापकास व्यवसायात प्रवेश करण्यापूर्वी मिळणारा त्या कामाचा अनुभव म्हणजे छात्रसेवाकाल होय.

उमेदवारी कार्य म्हणजे भावी शिक्षकाला त्याच्या व्यवसायात प्रत्यक्ष प्रवेश करण्यापूर्वी शालेय वातावरणाची अत्यंत निगडीत अनुभव मिळविण्याची व्यवस्था होय.

***एन.सी.ई.आर.टी***

छात्रसेवाकाला यासाठी Internship, Apprenticeship उमेदवारी कार्य, सेवापूर्व प्रशिक्षणाचा कालखंड, आंतरवासिता अशा वेगवेगळया संज्ञा वापरल्या जातात.

ऑक्सफोर्ड इंग्रजी शब्दकोशानुसार,
Intern : A junior doctor receiving training in a hospital.

हा वैदयक शास्त्रातील शब्द शिक्षणशास्त्रात आला आहे. दोन्हीही शास्त्रात हेतू समान आहे. प्रशिक्षण पूर्ण करून प्रत्यक्ष सेवेत हजर होण्यापूर्वी प्रत्यक्ष कामाचा अनुभव घेणे.

शिक्षकांच्या भावी व्यवसायिक, जीवनाची तयारी त्याच व्यवसायिक वातावरणात शिक्षक प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली करून देणे होय.

***1.2. छात्रसेवाकालाची उद्दिष्टे :***

1.प्रशिक्षणार्थीत व्यवसाय निष्णता निर्माण करणे.
2.शैक्षणिक व प्रशासकीय कौशल्ये निर्माण करणे.
3.शालेय वातावरण व सर्व मानवी घटकांचा परिचय करून देणे.
4.अनुभवी शिक्षकांच्या सान्निध्यात राहून प्रत्यक्ष कार्याचा अनुभव घेणे.

***2.समस्या विधान :***

शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रमाअंतर्गत छात्रसेवाकाल पूर्ण करताना येणाऱ्या समस्यांचा अभ्यास

***3.कार्यात्मक व्याख्या:***

***अ.शिक्षक प्रशिक्षण कार्यकम :***

माध्यमिक स्तरावर शिक्षक म्हणून सेवा करण्यासाठी आवश्यक असे सेवापूर्व प्रशिक्षण देणारे शिक्षण म्हणजे शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रम होय.

***ब.छात्रसेवाकाल :***

सेवापूर्व प्रशिक्षण घेत असताना भावी काळात शिक्षक म्हणून कराव्या लागणाऱ्या उपक्रमांचा व वर्ग अध्यापनाचा प्रत्यक्ष शाळेतील अनुभव म्हणजे छात्रसेवाकाल होय.

***4.संशोधनाची गरज :***

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर जवळजवळ 60 वर्षात साक्षरतेचे प्रमाण झपाटयाने वाढलेले आहे. विविध साधनांव्दारे विदयार्थ्यांना नवनवीन ज्ञान उपलब्ध होत आहे. ज्ञान व माहितीचा प्रचंड असा प्रस्फोट झाला आहे. त्यामुळे विद्यार्थी हा अधिकच चौकस झाला आहे. तेव्हा अशा विदयार्थ्यांना शिकविण्याचे काम शिक्षकांना करावे लागणार आहे. तेव्हा शिक्षकपण तेवढाच अनुभवाचे समृध्द असणे गरजेचे आहे.
1.तसेच या छात्रसेवाकाळात छात्रप्राध्यापकांना पाठ घेणे शैक्षणिक साधने तयार करणे विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करणे, सांस्कृतिक कार्यक्रम तसेच शालेय समस्यांचा अभ्यास विविध उपक्रम पार पाडताना, अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. त्या समस्या जाणून घेण्याच्या गरजेतून प्रस्तुत संशोधन केले आहे.
2.तेव्हा या छात्रशिक्षकांच्या समस्यावर प्रकाश पडला पाहिजे. त्या समोर याययला हव्या त्या सोडविण्यासाठी प्रयत्न मार्गदर्शन व्हावे, अशा विविध कारणांमुळे संशोधकाला प्रस्तुत संशोधन गरजेचे वाटते.
3.शिक्षक प्रशिक्षणातील छात्रसेवाकाल हा महत्वाचा असल्याने त्यातील सर्व घटकांचा येणाऱ्या समस्यांच्या गरजेतून प्रस्तुत संशोधन केले आहे.

***5.महत्व :***

1.प्रस्तुत संशोधनाने छात्रअध्यापकांना छात्रसेवाकाळात ज्या विविध समस्या भेडसावतात त्या लक्षात येतील.
2.छात्र अध्यापकांना पाठ घेणे, शैक्षणिक साधनांची निर्मिती असेल विविध उपक्रम राबविणे, क्रीडा, स्पर्धा घेणे असे उपक्रम राबविताना येणाऱ्या समस्या लक्षात येतील.
3.छात्रसेवाकाळासाठी शाळेचे किती प्रमाणात सहकार्य मिळते हे समजेल व अशा विविध समस्या त्यांना का येतात?त्यामागे कोणकोणते घटक कारणीभूत आहे यावर प्रकाश पाडला जाईल.
4.प्रस्तुत संशोधनामुळे समस्या लक्षात आल्यामुळे छात्रसेवाकाळाचे आयोजन करताना योग्य नियोजनपूर्वक काम करण्यास फायदा होईल.
5.एक दर्जेदार शिक्षक निर्माण होण्यासाठी छात्रसेवाकाळात जो अनुभव दिला जातो त्यामुळे सुधारणा घडवून आणण्यास प्रस्तुंत संशोधन महत्वाचे वाटते.
6.तसेच छात्रशिक्षकांना मार्गदर्शक म्हणून प्रस्तुत संशोधनाचा नक्कीच उपयोग होईल.
7.प्रस्तुत संशोधनामुळे छात्र अध्यापक, शिक्षक प्रशिक्षक, शाळेतील शिक्षक इ. घटकांना येणाऱ्या समस्या समाजातील व त्यामुळे एकत्रित सोडविण्याकरिता प्रयत्न करता येईल.

***6.पूर्व संशोधनाचा आढावा :***

1.'छात्रसेवा – कार्यक्रमासंबंधी शालेय शिक्षकांची मने जाणून घेणे व कार्यक्रमातील त्रुटींचा शोध घेउन त्यावर उपाययोजना सुचविणे'
डॉ. नलिनी पिचड, प्रा. सुरेखा जोशी, व प्रा. रंजना बरकले यांनी केलेल्या लघुसंशोधनाची व प्रस्तुत संशोधनाची काही उदिद्ष्टे यात साम्य आढळते. त्यांत छात्रसेवा कार्यक्रमामुळे शाळेला झालेला त्रास याचा शोध घेणे व शिक्षकांची या कार्यक्रमासंबंधी मते जाणून घेणे यांसारख्या उदि्दष्टांचा समावेश होतो.

सर्वेक्षण पध्दतीने केलेला पूर्व संशोधनाचे निष्कर्ष पुढीलप्रमाणे होते.
नमुना गटातील विद्यार्थी शिक्षक पाठ घेताना आशयज्ञान समृध्द असत नाहीत.
शाळेतील शिक्षक या कार्यक्रमासंबंधी सकारात्मक जाणवले नाहीत.
शालेय दप्तर किंवा इतर माहिती देणाऱ्या शिक्षकांच प्रमाण अल्प आढळले.

2.शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थींच्या आंतरसेवाकालामुळे संबंधित शाळांना येणाऱ्या अडचणींचा शोध घेणे व त्यावरील उपाययोजना अभ्यास.
– केशव रामचंद्र जाधव यांच्या संशोधनाचे आंतरसेवा उपक्रमामुळे शाळेत येणाऱ्या अडचणींचा शोध घेणे व त्यांच्या निराकरणासाठी उपायांचा शोध घेणे हे प्रमुख उदि्दष्ट होते. यातील काही प्रमुख निष्कर्ष असे :

आंतरसेवा उपक्रमामुळे शाळेतील शिस्त बिघडते.
आंतरसेवा उपक्रमाचे निरीक्षीत करण्यासाठी बहुसंख्य शिक्षक सहकार्य करत नाहीत.

***7.संशोधनाची उद्यिष्टे :***

1.छात्रसेवाकाळाची पूर्वतयारी करताना छात्राध्यापकांना येणाऱ्या समस्यांचा शोध घेणे.
2.शाळेमध्ये छात्रसेवाकाळाची प्रत्यक्ष अंमलबजावणी करत असताना छात्राध्यापकांना येणाऱ्या समस्यांचा अभ्यास करणे.
3.शाळेमध्ये छात्रसेवाकाळाची प्रत्यक्ष अंमलबजावणी करताना शाळेतील शिक्षकांना येणाऱ्या समस्यांचा शोध घेणे.
4.छात्रसेवाकाळ राबविताना शिक्षक प्रशिक्षकांना येणाऱ्या समस्यांचा अभ्यास करणे.

***8.संशोधनाची गृहितके :***

1.छात्रसेवाकाल अंतर्गत शिक्षक प्रशिक्षणाविषयी समृध्द अनुभव मिळतात.
2.शिक्षक प्रशिक्षणातील छात्रसेवाकाल हा शिक्षक परिपूर्णतेसाठी महत्वाचा भाग आहे.

***9.संशोधन पध्दती :***

प्रस्तुत संशोधनासाठी सर्वेक्षण पध्दतीची निवड करण्यात आली आहे.

***10.संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :***

***10.1व्याप्ती :***

सदर संशोधनाची व्याप्ती महाराष्ट्रातील सर्व शिक्षण महाविद्यालयांना लागू आहे.

***10.2 मर्यादा :***

1.प्रस्तुत संशेधनाचे निष्कर्ष हे छात्र अध्यापक, शिक्षक प्रशिक्षक व शिक्षक यांच्या प्रतिसादावर अवलंबून आहेत.
2.प्रस्तुत संशोधनासाठी पुणे शहरातील शिक्षण महाविद्यालयांची निवड केली आहे.
3.या संशोधनासाठी पुणे विद्यापीठाअंतर्गत राबविणाऱ्या अभ्यासक्रमाचाच समावेश करण्यात येणार आहे.
4.या संशोधनासाठी पुणे शहरातील मराठी माध्यमांच्या दहा शिक्षण महाविदयालयांची छात्रसेवाकाळाची राबविणाऱ्या दहा शाळांचीच निवड केली आहे.

***10.3 परिमर्यादा***

1.या संशोधनासाठी पुणे विद्यापीठाअंतर्गत राबविणाऱ्या अभ्यासक्रमाचाच समावेश करण्यात येणार आहे.
2.या संशोधनासाठी पुणे शहरातील मराठी माध्यमांच्या दहा शिक्षण महाविदयालयांची छात्रसेवाकाळाची राबविणाऱ्या दहा शाळांचीच निवड केली आहे.

***11.जनसंख्या व न्यादर्श :***

***11.1 जनसंख्या :***

महाराष्ट्रातील सर्व शिक्षण महाविद्यालय प्रशिक्षणार्थींची संख्या जनसंख्या म्हणून समावेश करण्यात आला आहे.

***11.2 न्यादर्श***

***अ. छात्राध्यापक निवड :***

प्रस्तुत संशोधन कार्यासाठी 10 शिक्षण महाविद्यालयातील प्रत्येक 10 छात्राध्यापकांची निवड सुगम यादृच्छिक नमुना निवड पध्दतीने केली.

***ब.प्राध्यापक निवड :***

प्रस्तुत संशोधन कार्यासाठी 10 शिक्षण महाविद्यालयातील प्रत्येकी 02 प्राध्यापकांची निवड सुगम यादृच्छिक नमुना निवड पध्दतीने केली.

***क.शाळांची व शिक्षकांची निवड :***

प्रस्तुत संशोधनासाठी ज्या शाळांमध्ये छात्रसेवाकाळाचे आयोजन केले जाते अशा 10 शाळा व त्यामधील प्रत्येकी 2 शिक्षकांची निवड सहेतुक नमुना निवड पध्दतीने केली.

***12.संशोधनाची साधने :***

प्रस्तुत संशोधनात संशोधकाने छात्रअध्यापक, शिक्षक प्रशिक्षक व शिक्षक यांचेकडून माहिती संकलनासाठी प्रश्नावली हे साधन वापरले. संख्याशास्त्रीय साधन म्हणून शेकडेवारीचा वापर केला आहे.

***13.संशोधनाची कार्यवाही***

प्रस्तुत संशोधनात संशोधकाने प्रश्नावली या साधनांचा वापर केला आहे. यासाठी 10 शिक्षणशास्त्र महाविदयालयातील 100 विद्यार्थी व 20 प्राध्यापक तसेच छात्रसेवाकाळ राबविणाऱ्या 10 शाळेतील 20 शिक्षकांकडून प्रश्नावली भरून घेतल्या. शेकडेवारीचा वापर करून उदि्दष्टनिहाय व प्रश्ननिहाय विश्लेषण केले. निष्कर्ष पुढीलप्रमाणे.

### *14.निष्कर्ष :*

#### *14.1 छात्रअध्यापकांना छात्रसेवाकालदरम्यान येणाऱ्या समस्या.*

1.छात्रसेवाकालाच्या नियोजनासाठी पुरेशा प्रमाणात वेळ मिळत नाही. असे 80 टक्के छात्र अध्यापकांचे म्हणणे आहे.
2.विविध प्रकारच्या पाठासाठी प्राध्यापकांचे पुरेसे मार्गदर्शन मिळत नाही.
3.तंत्रज्ञानाधिष्ठीत पाठ व अध्यापन प्रतिमानाचे पाठासाठी अनुक्रमे संगणक व संदर्भग्रंथ मिळत नाही.
4.अध्यापन प्रतिमानानुसार पाठ नियोजन करणे व सांघिक अध्यापन पध्दती पाठ वेळेत पूर्ण करणे अवघड जाते. असे बहुसंख्य छात्रअध्यापकांनी मत व्यक्त केले.
5.वर्गात तंत्रज्ञानाधिष्ठित पाठ घेण्यासाठी संगणकाची उपलब्धता नसते.
6.शाळेतील शिक्षकांकडून पाठाचे योग्य मूल्यमापन केले जात नाही. असे बहुसंख्य प्रतिसादकांना वाटते.
7.छात्रसेवाकाळातील सर्व उपक्रमात सहभागी होण्याची संधी मिळत नाही. यावरून छात्रसेवाकाळाचा हेतू पूर्णपणे साध्य झालेला वाटत नाही असे 70 टक्के छात्रअध्यापकांना वाटते.
8.छात्रअध्यापक हे शिकाउ शिक्षक असल्यामुळे विद्यार्थी त्यांना सहकार्य करत नाहीत. विद्यार्थी बेशिस्त वर्तन करतात. वर्गनियंत्रणाची गंभीर समस्या शाळेतून जाणवल्याचे 85 टक्के छात्रअध्यापकांनी मत व्यक्त केले.
9.शाळेतील ग्रंथालय व प्रयोगशाळा वापरण्याची परवानगी छात्राध्यापकांना नसते. शैक्षणिक दृष्टया संकुचितपणा जाणवतो.
10.छात्रसेवाकाळातील एकूणच सर्व उपक्रमांचे निकशानुसार व अचूक मूल्यमापन होत नसल्याचे मत बहुसंख्य छात्रसेवकांनी व्यक्त केले आहे. ही प्रमुख समस्या जाणवली.

#### *14.2.शिक्षक प्रशिक्षक पातळीवर छात्रसेवाकाळाबाबत समस्या :*

1.तंत्रज्ञानाधिष्ठित पाठासाठी संगणक, उपलब्ध होत नाही. यावरून शैक्षणिक साहित्याची कमतरता जाणवते. सांघिक अध्यापन पाठासंदर्भात प्राध्यापकांनाच सांघिक प्रशिक्षण मिळत नाही.
2.वेळेत प्रवेश पूर्ण न होणे या सार्वत्रिक समस्येमुळे पाठ मार्गदर्शनासाठी पुरेसा वेळ मिळत नाही व छात्राध्यापकांचे पूर्णवेळ पाठ निरीक्षण करणे शक्य होत नाही.
3.छात्रसेवाकाळातील सर्व उपक्रमासाठी पुरेसे मार्गदर्शन देता येत नाही.
4.मराठी माध्यमाच्या कमी होणाऱ्या तुकडयांमुळे शाळा मिळविण्यात अडचण येते. शाळेत बैठक व्यवस्थेच्या ठिकाणी स्वच्छतागृह, स्वच्छता यासारख्या सुविधा व्यवस्थित नसतात. यावरून छात्रसेवाकाळासाठी शाळा मिळविण्याचा व आरोग्यासारखा प्रश्न गंभीर झालेला दिसून येतो.
5.छात्राध्यापकांच्या पाठाचे शाळेतील शिक्षकांकडून योग्य मूल्यमापन होत नाही. तसेच छात्रसेवाकाळा विशयी शिक्षकांना परिपूर्ण माहिती देणे गरजेचे आहे. यावरून पर्यायी व्यवस्थेचा शोध घेणे किंवा इतर शिक्षण महाविदयालयाची प्राध्यापकांची छात्रसेवाकाळासाठी निवड करणे गरजेचे वाटते.
6.छात्रसेवाकाळाचा हेतू अंशतःच साध्य होतो. ही चिंताजनक बाब आहे.
7.छात्रसेवाकाळात प्राध्यापकांची भूमिका मार्गदर्शकांची असून अभ्यासक्रम पातळीवर सुधारणा होणे गरजेचे वाटते. यावरून अभ्यासक्रमात त्रुटी असलेल्या दिसून येते.
8.शहरी भागातील वाढत्या शिक्षण महाविदयालयांमुळे छात्रसेवाकालासाठी शाळांची उपलब्धत ही गंभीर समस्या बनली आहे.

#### *14.3.शिक्षकांना जाणवणाऱ्या समस्याः*

1.छात्रसेवाकाळामुळे शाळेतील पाठयक्रम पूर्ण करण्याचा कालावधी कमी होतो. यावरून विदयार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होते.
2.छात्राध्यापक शिकाउ असल्याने अध्यापन कौशल्यात कमी पडतात.
3.सवयी अभावी पाठ निरीक्षण करणे कंटाळवाणे व अतिरिक्त बोजा वाटतो. छात्रसेवाकाळामुळे शाळेतील गुणवत्तेचा प्रश्न निर्माण होतो.
4.छात्रसेवाकाळामुळे वर्गाध्यापनाच्या नियोजनात व्यत्यय येतो व नंतर वर्गात शिस्त ठेवण्यात अडचण येते. थोडक्यात छात्रसेवाकाळामुळे शाळेत प्रशासकीय व शिस्त विषयक समस्या निर्माण होते असे दिसून येते.
5.छात्रसेवाकाळामुळे विदयार्थींचे शैक्षणिक नुकसान होते. तसेच विदयार्थी प्रशिक्षणार्थीबाबत तक्रार करतात असे बहुसंख्य छात्रशिक्षकांनी मत व्यक्त केले. यावरून छात्रसेवाकाळातील अभ्यासक्रम व विविध उपक्रमामुळे गुणवत्ता वाढविण्याची गरज दिसते.
6.शिक्षण महाविदयालयांकडून शिक्षकांकरिता उद्बोधन वर्गाचे आयोजन केले जात नाही असे 80 टक्के प्रतिसादकांचे मत होते. त्यामुळे अपेक्षित उद्दिष्टये साध्य होत नाही.

### *15.ठळक निष्कर्ष :*

छात्रसेवाकाल कार्यक्रमाचे नियोजन व त्यांची अंमलबजावणी करताना छात्र अध्यापक, शिक्षक प्रशिक्षक व शाळेतील शिक्षक या तीनही घटकांना समस्या जाणवतात.

वेळेची मर्यादा, मार्गदर्शनाची मर्यादा, मार्गदर्शनातील तज्ज्ञता, शिक्षकांची छात्रसेवाकाल या उपक्रमाविषयी नकारात्मक मानसिकता, सहकार्याचा अभाव यांसारख्या समस्यांमुळे या कार्यक्रमाची उद्‌दिष्टये अपेक्षित रितीने साध्य होत नाहीत. या घटकांमध्ये अपेक्षित समन्वय साधला जात नाही. त्यामुळे याचा अपेक्षित दर्जा राखला जात नाही.

### *16.निष्कर्षाबाबत चर्चा :*

पिचड, जोशी व बटकले यांच्या संशोधनानुसार शालेय दप्तर व इतर माहिती देणाया शिक्षकांचे प्रमाण अल्प होते म्हणजेच शिक्षकांच्या सहकार्याचा अभाव दिसून येतो. तर प्रस्तुत संशोधनातही शिक्षकांकडून पाठ निरीक्षण व इतर उपक्रमांसाठी पुरेसे सहकार्य नसल्याचे आढळले. पूर्व संशोधनातील जाधव व पिचड, जोशी आणि बरकले यांच्या दोन्हीही संशोधनानुसार शिक्षक पाठनिरीक्षणाबाबत सहकार्य करत नसल्याचे आढळले. तोच निष्कर्ष प्रस्तुत संशोधनातूनही आढळला आहे. पूर्व संशोधनात व प्रस्तुत संशोधनात छात्रसेवाकाल दरम्यान विद्यार्थ्यांची शिस्त बिघडते असा निष्कर्ष आढळला. छात्रअध्यापक व शिक्षक यांच्या पातळीवर यासारख्याच समस्या जाणवल्या.

### *5.3 शिफारशी*

1.विविध प्रकारचे पाठ व सांघिक अध्यापन पध्दतीच्या पाठा संदर्भात पुरेसे मार्गदर्शन प्राध्यापकांनी करावे.
2.वर्गात संगणक, LCD, DLP, Slide Projector ची व्यवस्था करण्यात यावी. तसेच लाईट गेल्यावर पर्यायी व्यवस्था करावी.
3.छात्रसेवाकाळाचा हेतू साध्य होण्यासाठी नियोजन करावे.
4.छात्रसेवाकाळाचे नियोजन करताना सर्व प्राध्यापकांचे मत विचारात घ्यावे.
5.पाठ मार्गदर्शनासाठी पुरेशा प्रमाणात वेळ उपलब्ध करून देण्यात यावा.
6.छात्राध्यापकांचे पाठ इतर शिक्षण महाविदयालयाच्या प्राध्यापकांकडून करण्यात यावे जेणेकरून पाठाचे योग्य मूल्यमापन होईल.
7.छात्राध्यापकांना अध्यापन कौशल्याबाबत पुरेसे मार्गदर्शन मिळावे.
8.पाठ निरीक्षणाचा अतिरिक्त बोजा कमी करण्यात यावा.
9.शिक्षण महाविदयालयांनी शिक्षकांसाठी उद्‌बोधन वर्गाचे आयोजन करावे. परिणामी छात्रसेवाकाळातील सर्व उपक्रमांची परिपूर्ण माहिती होईल.

### *17.प्रस्तुत संशोधनाचे शैक्षणिक क्षेत्रातील योगदान :*

प्रस्तुत संशोधन हे छात्रसेवाकालातील समस्यांवर केंद्रीत असल्याने शिक्षण क्षेत्रात शिक्षण महाविदयालयात शिक्षक घडविताना प्रामुख्याने कोणत्या समस्या येतात यावर लक्ष केंद्रीत झाले. छात्रसेवाकालातील मुख्य घटक म्हणजे छात्रअध्यापक, शिक्षक प्रशिक्षक व शाळेतील शिक्षक यांच्या समस्यांचा एकत्रीत विचार प्रस्तुत संशोधनात केला असल्यामुळे या समस्यांची जाणीव सर्वांनाच होईल व नियोजन करताना या सोडविता येतील व परिपूर्ण नियोजन करता येईल.

प्रस्तुत संशोधनात शिक्षक प्रशिक्षणातील सर्वात महत्वाच्या घटकांचा विचार केला असल्यामुळे छात्रसेवाकाल यासारख्या अत्यंत महत्वाच्या उपक्रमाबाबत उद्घिष्टनिहाय समस्यांची जाणीव लाभार्थींना होईल व त्या सोडवून जास्तीत जास्त नियोजन व त्यांची अंमलबजावणी करता येईल.

### *संदर्भ :*

1.पारसनीस, न. रा., ( 2007), शिक्षकांचे प्रशिक्षण, पुणे : नित्य नूतन प्रकाशन.
2.चव्हाण, शैला, थिगळे राजेंद्र, (2008), नाशिक : इनसाईट पब्लिकेशन.
3.छात्रसेवा कार्यक्रमासंबंधीची शाळेय शिक्षकांची मते जाणून घेणे व कार्यक्रमातील त्रुटींचा शोध घेउन त्यावर उपाययोजना सुचविणे. (अप्रकाशित प्रबंध) शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नाशिक.
4.डॉ. जाधव, केशर रामचंद्र (2008), शिक्षणाशास्त्र महाविद्यालयातील प्रशिक्षणार्थ्यांच्या आंतरसेवाकाळामुळे संबंधित शाळांना येणाऱ्या अडचणींचा चेंबूर सर्वंकश शिक्षणशास्त्र महाविद्यालय, चेंबूर.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net